श्री. बी.डी.खुळे,तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लेखा),आरोग्य विभाग,जि.प.अ.नगर व से.नि.कनिष्ठ लेखाधिकारी पंचायत समिती शेवगाव यांच्या निलंबन कालावधीच्या निर्णयाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/४२८/२०२५
अहिल्यानगर,दिनांक - ०९/१०/२०२५

संदर्भः-
१. इकडील निलंबन आदेश क्र.अर्थ/कार्या-१/अस्था-१/१९७/२०१० दि. २१/०८/२०१०
२. इकडील दोषारोप पत्र क्र.आस्था-१/कार्या-२/२६५३/२०१० दिनांक १२/११/२०१०
३. आपणाकडील लेखी खुलासा दिनांक २५/११/२०१०
४. इकडील पुन:स्थापित आदेश क्र. अर्थ/कार्या-१/अस्था-१/२४९/२०११ दि. १६/०८/२०११
५. इकडील सादरकर्ता व चौकशी अधिकारी नेमणुक आदेश क्रमांक अर्थ/का-१/आस्था-१/६५/११ दिनांक १५/०१/२०११
६. सहाय्यक आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सी.आर. १०५/११, दिनांक १२/१२/२०११
७. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस अर्थ/कार्या-१/आस्था-१/१४/२०१२ दि. ०८/०१/२०१३
८. अंतिम कारणे दाखवा नोटिसीचे अनुषंगाने आपलेकडील खुलासा दिनांक २६/०३/२०१३
९. इकडील शिक्षेचा आदेश आदेश क्र. अर्थ/का-१/आस्था-१/५६७/२०१३ दि. १५/०७/२०१३
१०. निलंबन कालावधी नोटीस क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/२५४/२०२५ दि.२४/०७/२०२५
११. गट विकास अधिकारी पं.स.शेवगाव यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-१/७१७/२५ दि.२४/०९/२०२५ व त्या सोबत श्री.खुळे यांचा खुलासा दिनांक २४/०९/२०२५

श्री.बी.डी.खुळे , सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी व तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लेखा) हे आरोग्य विभाग,जि.प.अ.नगर येथे कार्यरत असतांना कार्यालयीन कामकाजातील हलगर्जीपणाबाबत संदर्भ क्रं.१ अन्वये श्री.खुळे यांना आदेश बजावलेच्या दिनांकापासून सेवा निलंबत करण्यात आले होते. श्री.खुळे यांचेवर संदर्भ क्र.२ अन्वये कामातील हलगर्जीपणाबाबत दोषारोप पत्र दिनांक १६/११/२०१० रोजी बजाविण्यात आले. सदर दोषारोप पत्राचा खुलासा श्री.खुळे यांनी संदर्भ क्र.३ अन्वये सादर केलेला असुन त्यांनी दोषारोप अमान्य केलेने त्यांचेविरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करुन संदर्भ क्रमांक ५ अन्वये विभागीय चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणेत आलेली होती. संदर्भ क्रमांक ६ अन्वये सदर चौकशी अहवाल प्राप्त झालेला होता. सदर चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार श्री.खुळे यांचेविरुध्द ठेवणेत आलेले दोन आरोप सिध्द होत नसलेबाबत अहवाल प्राप्त झालेला आहे.

उक्त चौकशी अहवालाशी असहमती दर्शवून श्री.खुळे यांना संदर्भ क्रमांक ७ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली होती. संदर्भ क्रमांक ८ अन्वये त्याबाबत श्री.खुळे यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे.

श्री.खुळे यांचेबाबत प्राप्त चौकशी अहवालावरील संबंधित कार्यालयाचे अभिप्राय व त्यांनी सादर केलेला खुलासा याचे अनुषंगाने श्री.खुळे यांना संदर्भ क्रमांक ९ अन्वये म.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) १९६४ चे भाग तीन नियम चार (२) नुसार त्यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकरीता बंद करणे ही शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

**श्री.बी.डी.खुळे ,सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी व तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचा दिनांक २१/०८/२०१० ते ३०/०९/२०११ असा एकूण ०१ वर्ष ०१ महिना ०९ दिवस (एकूण ४०६ दिवस)** या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधिन आहे. प्रस्तुत बाबत संदर्भ क्रमांक १० अन्वये दिलेल्या नोटीसला श्री.खुळे यांनी संदर्भ क्रमांक ११ अन्वये सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

त्या अनुषंगाने श्री. खुळे यांचे बाबतीत संदर्भ क्रमांक ६ अन्वये प्राप्त चौकशी अहवालाशी असहमती व संदर्भ क्रमांक ९ अन्वये त्यांचेविरुध्द लादणेत आलेली शिक्षा यामुळे श्री.खुळे यांचे सेवा निलंबन समर्थनीय ठरत असल्यामुळे **महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम ३ व ५ नुसार** सेवा निलंबन कालावधी सर्व कारणांसाठी सेवा निलंबन कालावधी धरणे समर्थनीय आहे.

त्यानुसार मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा-(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहून **श्री.बी.डी.खुळे ,सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी व तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचा दिनांक २१/०८/२०१० ते ३०/०९/२०११ असा एकूण ०१ वर्ष ०१ महिना ०९ दिवस (एकूण ४०६ दिवस) हा सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ** 'सेवानिलंबन' **कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.**

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००९०५००५८ असा आहे.

Signed by Anand
Subhashlal Bhandari
Date: 09-10-2025 20:43:01

**(आनंद भंडारी),भाप्रसे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

**श्री.बी.डी.खुळे , तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लेखा) व सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती शेवगाव जि.अहिल्यानगर**

द्वारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

२/-सदरचा आदेश संबंधितांस बजावून बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. सदर आदेशाची नोंद संबंधिताचे मूळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत :- निवडनस्ती.